# खोड़वा उस व्यवस्थापन

---

khodwa us niyojan

**ratoon sugarcane**

ratoon management in sugarcane

sugarcane ratoon crop management

ratoon cane

khodwa sugarcane

---

Meta Title - ratoon sugarcane: खोडवा ऊस व्यवस्थापन

Meta Desc - ऊस पिकातील खोडवा नियोजना बद्दल ratoon sugarcane माहिती जाणून घेण्यासाठी हा लेख नक्की वाचा आणि आवडला तर शेयर करा.

---

नमस्कार शेतकरी मित्रांनो, आपल्या Krushi Mitra Satish वेबसाइटवर आपले स्वागत आहे. आजच्या लेखात आपण ऊस पिकातील खोडवा व्यवस्थापनाची महत्वाची माहिती पाहणार आहोत. ऊस तुटल्यानंतर खोडवा ऊस व्यवस्थापन (ratoon management in sugarcane) या मध्ये खोडवा ऊस पाचट व्यवस्थापन, पानी नियोजन, खत व्यवस्थापन आणि कीड आणि रोग या बाबींचा योग्य वापर करून उत्पादनात वाढ करू शकतो.

**खोडवा ऊस पाचट व्यवस्थापन | Sugarcane trash Management:**

ऊस तोडणीच्या वेळी पाचट ओळीत न ठेवता, त्याच जागेवर टाकावे.

शेतात पाचटाचा ढीग राहिल्यास, तो योग्य प्रकारे पसरून वितरित करावा.

शक्य असल्यास, पाचट कुट्टी मशीन किंवा रोटावेटरने बारीक करावे.

ऊसाच्या बुडख्यावर असलेले पाचट बाजूला करून बुडखे मोकळे करावेत.

ऊसाचे बुडखे मोठे असल्यास, धारदार कोयत्याने छाटून घ्यावेत, जेणेकरून जमिनीतून नवीन कोंब फुटण्यास मदत मिळेल.

ब्ल्यु कॉपर फवारणीसाठी 30 ग्रॅम ब्ल्यु कॉपर प्रति 15 लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी, जेणेकरून बुरशीची वाढ रोखली जाईल.

पाचटावर 1 बॅग यूरिया **+3** बॅग सिंगल सुपर फॉस्फेट टाकून नंतर पाण्याचे नियोजन करावे.

वाफसा स्थिती निर्माण करण्यासाठी 2 लिटर कॉम्पोस्टिंग बॅक्टीरिया + 2 किलो काळा गूळ 200 लिटर पाण्यात भिजवून दुसऱ्या दिवशी पाचटावर फवारणी करावी.

ही प्रक्रिया 15 दिवसांनी पुन्हा करावी, जेणेकरून पाचट लवकर कुजेल.

पाचट व्यवस्थित कुजण्यासाठी बैल किंवा ट्रॅक्टरच्या साहाय्याने सरीच्या बगला पोडून घ्याव्यात, त्यामुळे ते मातीखाली जाऊन लवकर कुजते आणि पाणी देताना अडथळा येत नाही.

**खोडवा ऊस पानी नियोजन:**

खोडवा उसाला लागवड केलेल्या उसापेक्षा जास्त पाणी लागत नाही. आपल्या जमिनीच्या वाफसा स्थितीनुसार आणि हवामानाचा विचार करून पाणी व्यवस्थापन करावे.

- पावसाळ्यात गरज असल्यास 15-20 दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.
- हिवाळ्यात 10-15 दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.
- उन्हाळ्यात 8-10 दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.

**खोडवा ऊस खत व्यवस्थापन:**

खालील टेबल मध्ये एक एकर खोडवा ऊस खत व्यवस्थापन दिलेले आहे.

| **दिवस** | **खत** |
| --- | --- |

| | |
|---|---|
| **4-5 थ्या दिवशी** | **यूरिया - 1 बॅग + सिंगल सुपर फॉस्फेट (दानेदार) - 2 बॅग** |
| **35 - 40 दिवसात** | **24:24:00- 1 बॅग + पोटाश 1 बॅग + humic acid 5 किलो + फेरस सल्फेट 10 किलो + mgso 5 किलो + सल्फर 5 किलो** |
| **भरणी वेळी<br><br>75-85 दिवसात** | **नीम पेंड - 100 किलो + यूरिया 2 बॅग + 9:24:24 - 2 बॅग + पोटाश 2 बॅग + कॅल्शियम नायट्रेट 10 किलो + बोरॉन 2 किलो + मॅग्नेशियम सल्फेट 10 किलो + धानुका मयकोर 4 किलो + एनपीके - कोणसो जी - 23 किलो + फिप्रोनिल 5 किलो** |

**खोडवा ऊस कीड आणि रोग व्यवस्थापन:**

खलील टेबल मध्ये खोडवा कीड आणि रोग नियंत्रण माहिती आहे.

| **नाव** | **जैविक आणि रासायनिक नियंत्रण** |
|---|---|
| हुमणी आणि वाळवी | • बेणे उपचार करणे<br>• Metarhizium Anisopliae 2 किलो / एकर ड्रेंचिंग<br>• हमाला 1 लिटर / एकर / 200 लीटर पाणी<br>• लेसेंटा - 200 ग्रॅम + डेसिस 100 - 250 मिली 200 लीटर पाणी/ एकर ड्रेंचिंग |
| पांढरी माशी, मिली बग, लोकरी मावा. | • ॲडमायर 4 ग्रॅम / 15 लिटर पाणी<br>• अरेवा 10 gm/lit<br>• हमला 30 मिली / 15 लिटर पाणी<br>• ठिबक असेल तर अरेवा - 350 ग्रॅम / एकर द्यावे |

| | |
|---|---|
| खोडकीडा, (1:55) शेंडा पोखरणारीअळी (3:8) | मेटार्हिझियम ॲनिसोप्लिया - 75 मिलि 15 लिटर पाणी<br>• Em 1 - 8 - 10 ग्राम / 15 लिटर पाणी<br>• हमाला - 30 मिली / 15 लिटर पाणी<br>• कोराजन - 5-6 मिली / 15 लिटर पाणी<br>• एकरात फिप्रोनिल (ग्रॅन्युलर फॉर्म) 7 किलो वापरा((अल्ट्रा रीजेंट) |
| लाल कूज (red Rot) , उसावरची काणी | लागवड करण्यापूर्वी बेणे उपचार.<br>कार्बेन्डाझिम ५०% डब्ल्यूपी -१०० ग्रॅम,<br>**किंवा** मेटॅलॅक्सिल ८% डब्ल्यूपी + मॅन्कोझेब ६४% - २ ते २.५ ग्राम/लिटर<br>१० ते १५ मिनिट बुडवून ठेवा.) |
| गवताळ वाढ | जर पिकामध्ये गवताळ वाढ रोगाचा प्रादुर्भाव 15% पेक्षा जास्त असेल तर खोडवा टाळा.<br>व्हर्टिसिलियम लेकॅनी - प्रति लिटर 2-5 मिली<br>डाइमेथोएट 30% 2 ml/Lit **किंवा** थियामेथोक्सन 25 डब्ल्यूजी 0.5gm l/Lit **किंवा** ऐसफेट - 2 gm/lit |

सारांश -

ऊस तोडल्यानंतर योग्य पद्धतीने **पाचट व्यवस्थापन** केल्यास उत्पादन वाढते. पाचट ठिकाणीच ठेवून योग्यरीत्या वितरित करावे व कंपोस्टिंग प्रक्रियेस मदत करावी. **पाणी व्यवस्थापनासाठी**, पावसाळ्यात 15-20 दिवस, हिवाळ्यात 10-15 दिवस, आणि उन्हाळ्यात 8-10 दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. **खत व्यवस्थापनात**, नियोजनानुसार आवश्यक प्रमाणात नत्र, स्फुरद व पालाश यांचा समावेश करावा. **कीड आणि रोग नियंत्रणासाठी**, जैविक व रासायनिक उपायांचा अवलंब करून खोडकीडा, हुमणी व बुरशीजन्य रोग टाळावेत.

लेखक -

सतीश सोनवणे
मुपो. नांदगाव, तालुका - नगर,
जिल्हा - अहमदनगर